# संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची जाहिरात

**महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई चालक भरती सन २०१९**

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दल

**जाहिरात क्रमांक : २** **सिंधुदुर्ग** **दिनांक :-**

महाराष्ट्र सहाय्यक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९ मधील तरतुदींनुसार पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई चालक संवर्गात रिक्त होणारी २० पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई चालक पदाची भरती आयोजित करण्यांत येत आहे.

१) **पोलीस शिपाई चालक**

| | अजा | अज | विजा-अ | भज- ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एसई बीसी | इडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | २ | १ | ० | ० | १ | १ | ० | २ | २ | २ | १ | १२ |
| महिला | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ० | ६ |
| खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ |
| अंशकालीन पदवीधर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पोलीस पाल्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| गृहरक्षक दल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण- | **४** | **२** | **०** | **०** | **१** | **१** | **०** | **५** | **३** | **३** | **१** | **२०** |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१९ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्या पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुषेश व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisionl selection)असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचीका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचीकांमध्ये दिनांक २७/६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयायविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचीकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती

वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

ड) शासनाने लागू केलेले खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागू केलेले आरक्षण हे या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधिन असेल.

२) महाराष्ट्र सहाय्यक पोलीस उप निरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९ www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर (Home Page) वर व www.sindhudurgpolice.gov.in वर उपलब्ध असून ते पोलीस शिपाई चालक पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.

**महत्वाची टिप :-**

i. पोलीस शिपाई चालक भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती अ‍ॅन्टीकरप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग यांना दुरध्वनी क्रमांक ०२३६२-२२२२८९ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग यांचे कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०१९ तथा पोलीस अधीक्षक, व अपर पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उपअधीक्षक, (मुख्यालय),सिंधुदुर्ग यांच्याशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२८५५६१४ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

ii. उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र | कार्यालयाचे नाव | दुरध्वनी/मोबाईल क्र |
|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग (कार्यालयीन वेळेत) | ०२३६२-२२८२२५<br>०२३६२-२२८६१४ |

**( दिक्षीत गेडाम )**
पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग